# पंचायत समिती शेवगाव

तालुका – शेवगाव जिल्हा – अहिल्यानगर
यशोगाथा

**PANCHAYAT SAMIT SHEVGAON**
**BLOCK – SHEVGAON –DISTRICT-AHILYANAGAR**
**SUCCESS STORY**

# लाभार्थीचे परिचयपत्र

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना

लाभार्थी – श्री. सुखदेव माधव खंडागळे रा.हसनापूर ता.शेवगाव जि.अहमदनगर

प्रवर्ग – अनुसूचित जाती

मोबाईल नंबर – ८८०५८२९३१०

गट नंबर – २९० क्षेत्र – ०.६१ हेक्टर

लाभ दिलेल्या बाबी – १. नवीन विहीर रु २,५०,०००/-

२.पंपसंच रु. २०,०००/-

**महाराष्ट्र शासन , जिल्हा परिषद अहमदनगर, पंचायत समिती शेवगाव**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना यशोगाथा

# कृषि विभाग पंचायत समिति शेवगाव

श्री. सारंग दुगम, कृषि अधिकारी पं. स. शेवगाव

श्री. दिगंबर भांड, विस्तार अधिकारी (कृषि) पं. स. शेवगाव

## यशोगाथा

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना

लाभार्थी – श्री. सुखदेव माधव खंडागळे रा. हसनापूर ता. शेवगाव जि. अहमदनगर



डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना अंतर्गत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती मधील लाभार्थींना नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, पंपसंच, पाईपलाईन, वीज जोडणी, सोलर पंप, तुषार संच, ठिबक संच, शेततळे अस्तरीकरण या बाबींकरिता अनुदान दिले जाते. सदर बाबी या सिंचन सुविधेच्या निगडीत असल्याने पिकाकरीता आवश्यक सिंचन त्वरित मिळून लाभार्थीच्या पिकांचे उत्पादन वाढते. त्यामुळे शेतकरी बांधवांचे आर्थिक स्तर उंचावण्यास खूप मोठ्या प्रमाणात मदत होते.

श्री. सुखदेव माधव खंडागळे रा. हसनापूर यांना सदर योजनेविषयी माहिती पंचायत समिती येथे डकवलेल्या योजनेच्या प्रसिद्धी पत्रकामधून मिळाली. त्याचवेळेस त्यांनी या योजनेबद्दल कृषि अधिकारी यांना विचारणा करून योग्य ते मार्गदर्शन घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन

योजना सन २०२१-२२ या वर्षात महाडीबीटी पोर्टलवर नवीन विहीर आणि पंपसंच करिता ऑनलाइन अर्ज केला. त्यानंतर महाडीबीटी लॉटरी प्रक्रियेद्वारे त्यांची लाभ देणेसाठी निवड करणेत आली.

त्यांनी ७/१२ व ८ अ खाते उतारा, जातीचा व उत्पन्नाचा दाखला, ग्रामपंचायतचा ग्रामसभा ठराव, आधार कार्ड व बँक पासबुक ईत्यादी कागदपत्र ऑनलाईन अपलोड केले. कृषि विभाग पंचायत समिती शेवगाव यांनी त्यांना याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन केले.

त्यांच्या नावे ०.६१ हे. क्षेत्र आहे, नवीन विहीर नसल्याने ते कोरडवाहू कापूस, बाजरी, मठ, मुग हि पिके घेत होते. त्यांना कोणतेही बागायती पिक घेता येत नव्हते. त्यांना दुसऱ्याचे शेतात मजुरी करून उदरनिर्वाह करावा लागत होता. सदर नवीन विहीरचे अंदाजपत्रकास, तांत्रिक मान्यता घेऊन जिल्हा परिषदेकडून प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर नवीन विहीर या कामासाठी कार्यारंभ आदेश देण्यात आला. त्यानुसार त्यांनी सदर नवीन विहिरीचे हे खोदकाम पूर्ण केले. त्या वेळेस त्यांना पंपसंच देखील मंजूर होता. खोदकाम पूर्ण केलेनंतर त्यांना पंपसंच खरेदी करण्यास सांगून त्यांना अनुदान देणेत आले. त्यांनतर लाभार्थीने नवीन विहिरीचे बांधकाम पूर्ण केले. आणि लाभार्थीस उर्वरित अनुदान त्यांच्या खातेवर वर्ग करण्यात आले.

वरील सर्व बाबींचा लाभ मिळाल्यानंतर त्यांनी आपले शेतात कापूस, तूर, उस,मका व कांदा पिकाची लागवड केली. शाश्वत सिंचनाची सोय झाल्यामुळे त्यांना पहिल्याच वर्षात ६००००/- उत्पन्न मिळाले. तसेच पाण्याची सोय झाल्याने घरी असलेल्या जनावरांना हिरवा चारा घास व मका उपलब्ध झाला. त्यामुळे आपलेच शेतात काम करून रोजगार उपलब्ध झाला व समाधानकारक उत्पन्न मिळाले. सदर कामाची कृषि अधिकारी श्री सारंग दुगम, व श्री. दिगंबर भांड, विस्तार अधिकारी (कृषि) पंचायत समिती शेवगाव यांनी पाहणी करून वेळोवेळी मार्गदर्शन केले. तसेच मा. कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर आणि शेवगाव पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांचे योजना राबविनेबाबत नियमित मार्गदर्शन लाभले.

श्री. सारंग दुगम, कृषि अधिकारी (विघयो) पंचायत समिती शेवगाव
श्री. दिगंबर भांड, विस्तार अधिकारी (कृषि) पंचायत समिती शेवगाव

# लाभार्थीचे परिचयपत्र

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना

लाभार्थी नाव – श्री.देवदान दादाबा घाडगे

प्रवर्ग – अनुसूचित जाती

रा. नजिक बाभूळगाव ता. शेवगाव जि. अहमदनगर

मोबाईल नंबर – ८७८८८९७०५३

गट नंबर – ४८ क्षेत्र – १.७५ हेक्टर

लाभ दिलेला बाबी – १. नवीन विहीर – रु २,५०,०००/-

२.सौर कृषि पंप लाभार्थी हिस्सा – रु. ८२८०/-

**महाराष्ट्र शासन , जिल्हा परिषद अहमदनगर , पंचायत समिती शेवगाव**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना यशोगाथा

## कृषि विभाग पंचायत समिती शेवगाव

श्री. सारंग दुगम, कृषि अधिकारी (विघयो) पं. स. शेवगाव

श्री. दिगंबर भांड, विस्तार अधिकारी (कृषि) पं. स. शेवगाव

दिनांक ०६/२०२३

**यशोगाथा**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना**

लाभार्थी – श्री. देवदान दादाबा घाडगे, रा. नजिक बाभूळगाव, ता. शेवगाव जि. अहमदनगर



डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन  योजना सन २०१७/१८ पासून कार्यान्वित झालेली आहे.  सदर योजनेत जुन्या विशेष घटक  योजनेच्या तुलनेत सिंचन विषयक बाबीकरिता भरीव तरतूद करणेत आलेली आहे.  सदर योजनेतून अल्प उत्पन्न असलेल्या, अनु.जातीच्या शेतकऱ्यांना सिंचन विषयक बाबीकरिता नवीन विहीर,  जुनी विहीर दुरुस्ती,  शेततळे अस्तरीकरण,  वीज जोडणी,  पंप संच, तुषारसंच,  ठिबकसंच या बाबीकरिता भरीव व पॅकेज स्वरुपात अनुदान दिले जाते.

अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील नजिक बाभूळगाव  येथील देवदान दादाबा घाडगे यांना  ग्रामपंचायतद्वारे  सदर योजनेची माहिती मिळाली.  त्यांची नजिक बाभूळगाव येथे १.७५  हेक्टर जमीन आहे.

त्यानुसार त्यांनी पंचायत समिती कृषि विभागाशी संपर्क साधला असता त्यांना योजना समजावून सांगितली व नवीन विहीर पॅकेज अंतर्गत विविध बाबींचा लाभ घेता येईल, असे कृषि अधिकारी व विस्तार अधिकारी यांनी सांगितले. त्यानुसार त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना सन २०२०/२१ या वर्षात महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज केला. त्यानंतर महाडीबीटी लॉटरी प्रक्रियेद्वारे त्यांची नवीन विहीर व सौर कृषि पंप लाभार्थी हिस्सा लाभ देणेसाठी निवड झाली. त्यांनी ७/१२ व ८ अ खाते उतारा, जातीचा व उत्पन्नाचा दाखला, आधार कार्ड व बँक पासबुक ईत्यादी कागदपत्र ऑनलाईन अपलोड केले. कृषि विभाग पंचायत समिती शेवगाव यांनी त्यांना याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन केले.

वरील सर्व बाबींचा लाभ मिळाल्यानंतर त्यांनी आपले शेतात गहू, तूर, भुईमुग, मिरची, वांगी इ. भाजीपाला पिकाची लागवड केली. शाश्वत सिंचनाची सोय झाल्यामुळे त्यांना पहिल्याच वर्षात ६० ते ६५ हजार रुपयाचे उत्पन्न मिळाले. तसेच पाण्याची सोय झाल्याने जनावरांना हिरवा चारा घास व मका द्वारे उपलब्ध होऊन दुग्ध उत्पादन वाढले. त्यापासून दुग्धव्यवसायातून जोडधंदा उत्पन्न रु.३० ते ४० हजार रुपये मिळाले त्यामुळे आपलेच शेतात काम करून रोजगार उपलब्ध झाला व समाधानकारक उत्पन्न मिळाले.सदर कामाची कृषि अधिकारी (विघयो) श्री. सारंग दुगम व श्री. दिगंबर भांड, विस्तार अधिकारी (कृषि) पंचायत समिती शेवगाव यांनी पाहणी करून वेळोवेळी मार्गदर्शन केले. तसेच मा. कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर व शेवगाव पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांचे योजना राबविनेबाबत नियमित मार्गदर्शन लाभले.

श्री. सारंग दुगम, कृषि अधिकारी (विघयो) पंचायत समिती शेवगाव
श्री. दिगंबर भांड, विस्तार अधिकारी (कृषि) पंचायत समिती शेवगाव

महाराष्ट्र शासन

जिल्हा परिषद अहिल्यानगर

पंचायत समिती शेवगाव

# नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रिय खत व्यवस्थापन कार्यक्रम

## सन २०२४-२५

## यशोगाथा

**बायोगॅस सयंत्र**

कृषि विभाग
पंचायत समिती शेवगाव

श्री.जाधव आर.एस.
श्री.भांड डी.एम.
श्री.फाजगे जी.एच.
विस्तार अधिकारी (कृषि),पंचायत समिती शेवगाव

नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रिय खत व्यवस्थापन कार्यक्रम

# यशोगाथा

लाभार्थीचे नांव :- **श्री.भीमराव एकनाथ आल्हाट (अनु.जाती)**

**रा.वाघोली, ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर**

**नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रिय खत व्यवस्थापन कार्यक्रम अंतर्गत बायोगॅस बांधकाम करणे या योजनेची माहिती पंचायत समिती शेवगाव कृषि विभागामार्फत मिळाली, त्यानुसार लाभार्थीने बायोगॅस बांधकाम करणेची इच्छा व्यक्त केली, सदर लाभार्थीस बायोगॅस बांधकाम करण्याचे निश्चित झाल्यानंतर सदर गावचे ग्रामसेवक, विस्तार अधिकारी (कृषि) व बायोगॅस बांधकाम करणारे टर्न की वर्कर यांनी सदर लाभार्थीचे घरी भेट देऊन जागा निश्चित करून आखणी करून देण्यात आली. बायोगॅस बांधकाम करणेसाठी वाळू – सव्वा ब्रास, खडी – अर्धा ब्रास, सिमेंट – १८ गोणी, स्टील – ८०-८५ किलो, पीव्हीसी पाईप – ७ फुट, बायंडिंग तार – ३ किलो असे साहित्य आणल्यानंतर बायोगॅस बांधकाम प्रशिक्षित गवंडी श्री.राजेंद्र तुपे यांनी सदर बायोगॅस चे आरसीसी बांधकाम पूर्ण केले. सदर बायोगॅस बांधकाम करणेसाठी एकूण रु.३२५००/- खर्च आला, त्यासाठी लाभार्थीस पंचायत समिती मार्फत अनुसूचित जाती साठी रक्कम रुपये २२०००/- व जिल्हा परिषद सेस फंड योजनेतून प्रोत्साहनपर रक्कम रु.४९६०/- असे एकूण रक्कम रु.२६९६०/- रुपये अनुदान मिळाले.**




**मौजे – वाघोली येथे बायोगॅस काम पाहणी करताना मा.कृषि विकास अधिकारी सुधीर शिंदे साहेब, मोहीम अधिकारी अमृत गांगर्डे साहेब, कृषि अधिकारी राहुल कदम, विस्तार अधिकारी (कृषि) दिगंबर भांड, रामकिसन जाधव, सरपंच उमेश भालसिंग व लाभार्थी.**











सदर बायोगॅस संयंत्रामध्ये जनावरांचे शेण तसेच घरातील उरलेले शिळे अन्न, भात इत्यादी टाकण्यात येते त्यामुळे भरपूर बायोगॅस ची निर्मिती होते, श्री.भीमराव एकनाथ आल्हाट यांची घरची परिस्थिती नाजूक असल्यामुळे त्यांना एलपीजी गॅस चा खर्च परवडत नाही म्हणून त्यांनी बायोगॅस बांधकाम पूर्ण केले असून आज रोजी त्यांचा सर्व स्वयंपाक होऊन सुद्धा बायोगॅस उरत आहे, त्यामुळे त्यांचा एलपीजी गॅस चा खर्चामध्ये बचत होत असून बायोगॅस मधून बाहेर पडणारी शेणाची स्लरी पासून उत्तम प्रकारचे शेणखत तयार होत आहे त्याचा शेतामध्ये वापर होत असून पिक उत्पन्नात देखील वाढ झाली आहे, तसेच चुलीसाठी सरपण तोडणे, चुलीच्या धुरापासून होणाऱ्या त्रासापासून आल्हाट कुटुंबाची सुटका झाल्याने आल्हाट कुटुंब आनंदी आहे.

सदर कामाची कृषि अधिकारी राहुल कदम व रामकिसन जाधव, दिगंबर भांड, गौतम फाजगे विस्तार अधिकारी (कृषि) पंचायत समिती शेवगाव यांनी पाहणी करून वेळोवेळी मार्गदर्शन केले. तसेच जिल्हा परिषद अहिल्यानगर चे कृषि विकास अधिकारी सुधीर शिंदे साहेब व शेवगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अजितकुमार बांगर साहेब यांचे योजना राबविणे बाबत नियमितपणे मार्गदर्शन लाभले.

# तालुक्यातील TOP 10 यशस्वी महिला उद्योजकांच्या


# यशोगाथा



उमेद अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात महिला बचत गटांची स्थापना करण्यात आली आहे. यातून ग्रामीण भागातील महिला उद्योजकांना पाठबळ मिळते आहे.

अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यामध्ये मोठ्या स्वरूपाचे उद्योग व्यवसाय महिलांनी उभारले आहेत. यातून ग्रामीण भागातील महिला पुढे येत आहेत, याचा मला मनस्वी आनंद होत आहे. उमेद अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यामध्ये सुरू असलेल्या अशा उपक्रमांना जिल्हा परिषद, अहिल्यानगर नेहमी पाठबळ देण्याचे काम करेल.

| | |
|---|---|
| महिलेचे नाव व पत्ता | ज्योती किशोर बोरुडे , गाव – शहरटाकळी, तालुका – शेवगाव , जिल्हा अहिल्यानगर |
| SHG चे नाव | मोगरा स्वयं सहायता समूह |
| उमेद कडून आर्थिक मदत | बँकेचे कर्ज 300000 रू,अंतर्गत गट कर्ज 30000 |
| व्यवसायाबाबत माहिती (सुरुवात, भांडवल, प्रशिक्षण इत्त्यादी) | फरसाण ,वडापाव ,जिलेबी ,गोडीशेव ,इत्यादी ,पदार्थ बनवत आहे .<br>सुरवातीचे भंडवल फक्तं 20000 होते अभियानाच्या माध्यमातून समूहाला बँक कर्ज मिळाले .त्या मधून त्यांना 50000 रू मिळाले. |
| व्यवसायातून केलेली प्रगती<br>(विक्री, सामाजिक स्थितीतील बदल) | सुरुवातीच्या छोट्या उद्योगातून अभियानाच्या माध्यमातून मिळालेल्या अर्थ साहाय्याने उद्योगास साहित्य कुलिंग फ्रिज, भट्टा लागणारे भांडे मशीन खरेदी करता आली आणि आता उत्कृष्ठ पदार्थ तयार करून आठवडी बाजार मध्ये स्टॉल लावून मोठी कमाई करता येऊ लागली.वार्षिक उलाढाल 6 लाख पर्यंत होत असून निव्वळ उत्पन्न 3.5 लाख होत आहे.या मुळे कुटुंबाची चांगली प्रगती होत असून मान सन्मान आणि आत्मविश्वास वाढला आहे. |
| उमेद अभियानाबाबत मत | उमेद अभियानामुळे मिळालेल्या अर्थ साहाय्याने आत्मविश्वास वाढला आणि आता कुटुंबातील 3 व्यक्तींना रोजगार निर्माण झाल्यामुळे उमेद अभियानामुळे कुटुंबातील आर्थिक प्रगती झाल्यामुळे मानसन्मान मिळाला . जय उमेद . धन्यवाद |

| | |
|---|---|
|  |  |
|  |  |

| | |
|---|---|
| महिलेचे नाव व पत्ता | रिबिका अमोल मुगुटमल गाव – मजलेशहर , तालुका – शेवगाव , जिल्हा अहिल्यानगर |
| SHG चे नाव | माऊली स्वयं सहायता समूह |
| उमेद कडून आर्थिक मदत | समूहाच्या माध्यमातून बँक कर्ज 460000 . अंतर्गत कर्ज 20000 रू |
| व्यवसायाबाबत माहिती (सुरुवात, भांडवल, प्रशिक्षण इत्त्यादी) | स्पेशल कंदूरी काळा मसाला . सुरुवात गावातील समूहाच्या बैठका मध्ये जाहिरात केली .लागणारे भांडवल समूहाच्या माध्यमातून उपलब्ध झाले आणि आता चांगल्या प्रकारे उलाढाल होत आहे |
| व्यवसायातून केलेली प्रगती (विक्री, सामाजिक स्थितीतील बदल) | स्पेशल कंदूरि काळा मसाला उत्कृष्ठ असून चवदार आहे त्याची मागणी मोठ्या प्रमाणत होत असून . या उद्योगातून कुटुंबातील 2 व्यक्तीच्या हाताला काम सुरू झाले कुटुंबाची आर्थिक प्रगती झाल्यामुळे समजत मानसन्मान मिळत आहे |
| उमेद अभियानाबाबत मत | उमेद अभियानामुळे आर्थिक अडचण दूर झाली आणि उद्योग सुरू करण्याची हिम्मत आली.आमचा उद्योग उमेद मुळे सुरू झाला आहे.धन्यवाद उमेद अभियान. |

| | |
|---|---|
|  |  |
|  |  |

| | |
|---|---|
| महिलेचे नाव व पत्ता | **कोमल ज्ञानेश्वर दळे** |
| SHG चे नाव | दत्तकृपा स्वयं सहायता समूह ग्रापंचायत –आखेगाव, तालुका शेवगाव जिल्हा - अहिल्यानगर |
| उमेद कडून आर्थिक मदत | मातीचे मडके,पणत्या,मातीचे बैल,गणपती,चूल व घर सजावटीचे आकर्षक वस्तू ,इत्यादी ,वस्तू बनवत आहे .<br>सुरवातीचे भंडवल फक्तं ५००० होते अभियानाच्या माध्यमातून समूहाला बँक कर्ज मिळाले .त्या मधून त्यांना २५००० रू मिळाले. |
| व्यवसायाबाबत माहिती (सुरुवात, भांडवल, प्रशिक्षण | सुरुवातीच्या छोट्या उद्योगातून अभियानाच्या माध्यमातून मिळालेल्या अर्थ साहाय्याने उद्योगास लागणारे चाक खरेदी केले त्यातून मातीचे विविध प्रकारचे भांडे तयार केले व त्यामधून मोठा व्यवसाय निर्माण करण्यात आला. आणि आता उत्कृष्ठ वस्तू तयार करूनवेगवेगळया सणाला तसेच हंगामी वस्तूची विक्री केली |
| व्यवसायातून केलेली प्रगती (विक्री, सामाजिक स्थितीतील बदल) | अभियानाच्या माध्यमातून मिळालेल्या अर्थ साहाय्याने उद्योगास लागणारे चाक खरेदी केले त्यातून मातीचे विविध प्रकारचे भांडे तयार केले व त्यामधून मोठा व्यवसाय निर्माण करण्यात आला. |
| उमेद अभियानाबाबत मत | उमेद अभियानामुळे मिळालेल्या अर्थ साहाय्याने आत्मविश्वास वाढला आणि आता कुटुंबातील 2 व्यक्तींना रोजगार निर्माण झाल्यामुळे उमेद अभियानामुळे कुटुंबातील आर्थिक प्रगती झाल्यामुळे मानसन्मान धन्यवाद |

| | |
|---|---|
|  |  |
|  |  |

| | |
|---|---|
| महिलेचे नाव व पत्ता | सुनिता दत्तू तुपे |
| SHG चे नाव | वृंदा स्वयं सहायता समूह  ग्रापंचायत –गदेवाडी , तालुका शेवगाव जिल्हा -अहिल्यानगर |
| उमेद कडून आर्थिक मदत | शेवई ,पापड ,जेलीबी ,फरसाण ,इत्यादी ,वपदार्थ बनवत आहे .<br>सुरवातीचे भंडवल फक्तं ५००० होते अभियानाच्या माध्यमातून समूहाला बँक कर्ज मिळाले . त्या मधून त्यांना ३००००  रू मिळाले. |
| व्यवसायाबाबत माहिती<br>(सुरुवात, भांडवल, प्रशिक्षण इत्त्यादी) | सुरुवातीच्या छोट्या उद्योगातून अभियानाच्या माध्यमातून मिळालेल्या अर्थ साहाय्याने उद्योगास लागणारे कच्चा माल  खरेदी केले त्यातून लाडू,शेव ,जेलीबी  ,तयार केले व त्यामधून मोठा व्यवसाय निर्माण करण्यात आला. आणि आता उत्कृष्ठ पदार्थ  तयार करून वेगवेगळया सणाला तसेच हंगामी विक्री ,आठवडी बाजार मध्ये स्टॉल लावून मोठी कमाई करता येऊ लागली ..वार्षिक उलाढाल 3 लाख पर्यंत होत असून उत्पन्न 2 लाख होत आहे .या मुळे कुटुंबाची चांगली प्रगती होत आहे. |
| व्यवसायातून केलेली प्रगती<br>(विक्री, सामाजिक स्थितीतील बदल) | स्पेशल चिवडा ,उत्कृष्ठ जेलीबी असून चवदार आहे त्याची मागणी मोठ्या प्रमाणत होत असून . या उद्योगातून कुटुंबातील 3 व्यक्तीच्या हाताला काम सुरू झाले कुटुंबाची आर्थिक प्रगती झाल्यामुळे समजत मानसन्मान मिळत आहे |
| [illegible] | [illegible] मिळालेल्या अर्थ साहाय्याने आत्मविश्वा [illegible] |







| | |
|---|---|
| महिलेचे नाव व पत्ता | पूजा दिलीप जोगदंड |
| SHG चे नाव | लक्ष्मी महिला स्वयं सहायता समूह ग्रामपंचायत-बेलगाव,तालुका शेवगाव,जि.अहिल्यानगर |
| उमेद कडून आर्थिक मदत | बँक कर्ज ५००००,खेळते भांडवल १५०००,cif निधी ६००००,उत्पादक गट कर्ज २५००० रु |
| व्यवसायाबाबत माहिती (सुरुवात, भांडवल, प्रशिक्षण इत्त्यादी) | विविध  प्रकारचे झाडू बनवणे,<br>सुरवातीचे भंडवल फक्तं १०००० रु होते अभियानाच्या माध्यमातून समूहाला बँक कर्ज मिळाले . त्या मधून त्यांना ५०००० रू मिळाले.cif कर्ज,उत्पादक गट कर्ज यामधून त्यांनी झाडू बनवायचे मशीन खरेदी केले |
| व्यवसायातून केलेली प्रगती (विक्री, सामाजिक स्थितीतील बदल) | झाडू जे पूर्वी हाताने बनवत होते ते मशीन घेतिली त्यामुळे काम करण्यास वेळ लागत होता आता जास्त काम होऊन मागणी वाढली ,आणि आठवडी बाजारात विक्री केली जाते,घरातील ४ व्यक्तीला रोजगार मिळाला . |
| उमेद अभियानाबाबत मत | अनु जाती चे समूह असूनही उमेद अभियानाकडून मदत झाल्यामुळे आर्थिक स्थिती बदलली व प्रगती झाली त्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह झाला धन्यवाद उमेद |






| | |
|---|---|
| महिलेचे नाव व पत्ता | श्रीमती वर्षा पालवे गाव - जोहरापुर, तालुका – शेवगाव , जिल्हा.अहिल्यानगर |
| SHG चे नाव | प्रगती महिला स्वयं सहायता समूह |
| उमेद कडून आर्थिक मदत | बँकेचे कर्ज 20000रू,अंतर्गत गट कर्ज 30000 |
| व्यवसायाबाबत माहिती (सुरुवात, भांडवल, प्रशिक्षण इत्त्यादी) | ब्युटी पार्लर<br>सुरवातीचे भंडवल फक्तं 10000 होते अभियानाच्या माध्यमातून समूहाला बँक कर्ज व मिळाले . अंतर्गत गट कर्जत्या मधून त्यांना 50000 रू मिळाले. |
| व्यवसायातून केलेली प्रगती (विक्री, सामाजिक स्थितीतील बदल) | सुरुवातीच्या छोट्या उद्योगातून अभियानाच्या माध्यमातून मिळालेल्या अर्थ साहाय्याने उद्योगास साहित्य कुलिंग फ्रिज, भट्टा लागणारे भांडे मशीन खरेदी करता आली आणि आता उत्कृष्ठ पदार्थ तयार करून आठवडी बाजार मध्ये स्टॉल लावून मोठी कमाई करता येऊ लागली ..वार्षिक उलाढाल 6 लाख पर्यंत होत असून निव्वळ उत्पन्न 3.5 लाख होत आहे .या मुळे कुटुंबाची चांगली प्रगती होत असून मान सन्मान आणि आत्मविश्वास वाढला आहे. |
| उमेद अभियानाबाबत मत | उमेद अभियानामुळे मिळालेल्या अर्थ साहाय्याने आत्मविश्वास वाढला आणि आता कुटुंबातील 3 व्यक्तींना रोजगार निर्माण झाल्यामुळे उमेद अभियानामुळे कुटुंबातील आर्थिक प्रगती झाल्यामुळे मानसन्मान मिळाला . जय उमेद . |



| | |
|---|---|
| महिलेचे नाव व पत्ता | चंदा बाळासाहेब शिंदे |
| SHG चे नाव | रेणुका माता स्वयं सहायता समूह ,गाव –भाविनिमगाव ,तुका –शेवगाव ,जिल्हा –अहिल्यानगर |
| उमेद कडून आर्थिक मदत | RF – 30000,CIF – 60000, बँक कर्ज – 300000, PM |
| व्यवसायाबाबत माहिती (सुरुवात, भांडवल, प्रशिक्षण इत्यादी) | कुकुट पालन |
| व्यवसायातून केलेली प्रगती (विक्री, सामाजिक स्थितीतील बदल) | रेणुका माता महिला गटास बँक अर्थ सहाय्य- 300000 मिळाले तसेच दिशा ग्रामसंघातून RF – 30000,CIF – 60000, मिळाले व गटातील महिला सदस्याचे व्यवसाय वाढ होण्यास गती मिळाली. चंदा बाळासाहेब शिंदे यांनी व्यवसाय सुरु केला,सुरवातीला 10 कोंबडी पाळून सुरवात केली आता 300 कोंबडी आहे. |
| उमेद अभियानाबाबत मत | उमेद अभियान मार्फत व्यवसाय सुरु करण्यासाठी यांना वयक्तिक कर्ज मिळाले यामुळे त्यांना आर्थिक हातभार लागला व त्यांची आर्थिक उन्नती बरोबरच ग्रामीण उद्योजिका म्हणून त्यांची समाजात नवी ओलख तयार झाली आहे. |




Shot on V9Pro
vivo dual camera


Shot on V9Pro
vivo dual camera


Shot on V9Pro
vivo dual camera

| | |
|---|---|
| महिलेचे नाव व पत्ता | अयोध्या तुकाराम कणसे ,गाव – चेडे चांदगाव  तालुका –शेवगाव –जिल्हा – अहिल्यानगर |
| SHG चे नाव | रासुमाता महिला स्वयं सहायता समुह |
| उमेद कडून आर्थिक मदत | RF – 30000,CIF – 60000, बँक कर्ज – 300000,उपजीविका निधी 340000 |
| व्यवसायाबाबत माहिती (सुरुवात, भांडवल, प्रशिक्षण इत्यादी) | सुरुवातीच्या छोट्या उद्योगातून अभियानाच्या माध्यमातून मिळालेल्या अर्थ साहाय्याने उद्योगास लागणारे शेळी ,बोकड खरेदी केले त्यातून मोठा व्यवसाय निर्माण करण्यात आला.आणि आता उत्कृष्ठ उत्पादन सुरु झाले आहे.सदरील व्यवसायमुळे कुटुंबाची चांगली प्रगती होत |
| व्यवसायातून केलेली प्रगती (विक्री, सामाजिक स्थितीतील बदल) | रासुमाता महिला गटास बँक अर्थ सहाय्य- 300000 मिळाले तसेच क्रांतीज्योती  ग्रामसंघातून RF – 30000,CIF – 60000, बँक कर्ज – 300000,उपजीविका निधी 340000 मिळाले व गटातील महिला सदस्याचे व्यवसाय वाढ होण्यास गती मिळाली. बोकड व शेळी चिकन साठी विकण्यात येते . |
| उमेद अभियानाबाबत मत | उमेद अभियान मार्फत व्यवसाय सुरु करण्यासाठी अयोध्या तुकाराम कणसे वयक्तिक कर्ज त्यांना आर्थिक |

| | |
|---|---|
|  |  |
|  |  |

| | |
|---|---|
| महिलेचे नाव व पत्ता | गीता बाबासाहेब सुरासे |
| SHG चे नाव | रामकृष्ण हरी महिला स्वयं सहायता समूह ग्रामपंचायत-बेलगाव,तालुका शेवगाव,जि.अहिल्यानगर |
| उमेद कडून आर्थिक मदत | RF – 30000,CIF – 60000, बँक कर्ज – 300000 |
| व्यवसायाबाबत माहिती (सुरुवात, भांडवल, प्रशिक्षण इत्त्यादी) | मका भरडा,वालीस पशु खाद्य बनविणे.<br>सुरवातीचे भंडवल फक्त 40000 होते अभियानाच्या माध्यमातून समूहाला बँक कर्ज व  मिळाले . अंतर्गत गट कर्जत्या मधून त्यांना 50000 रू मिळाले. |
| व्यवसायातून केलेली प्रगती (विक्री, सामाजिक स्थितीतील बदल) | अभियानाच्या माध्यमातून मिळालेल्या अर्थ साहाय्याने उद्योगास लागणारे मशिनरी  खरेदी केले त्यातून  मका भरडा ,आटा  तयार केले व त्यामधून मोठा व्यवसाय निर्माण करण्यात आला. |
| उमेद अभियानाबाबत मत | उमेद अभियान मार्फत व्यवसाय सुरु करण्यासाठी गीता बाबासाहेब सुरासे यांना वयक्तिक कर्ज मिळाले यामुळे त्यांना आर्थिक हाथभार लागला व त्यांची आर्थिक उन्नती बरोबरच ग्रामीण उद्योजिका म्हणून त्यांची समाजात |






| | |
|---|---|
| महिलेचे नाव व पत्ता | मनीषा ज्ञानदेव करंजे ,रांजणी ,तालुका –शेवगाव ,जिल्हा –अहिल्यानगर |
| SHG चे नाव | चैतन्य महिला स्वयं सहायता समुह |
| उमेद कडून आर्थिक मदत | RF – 30000,CIF – 60000, बँक कर्ज – 460000 |
| व्यवसायाबाबत माहिती (सुरुवात, भांडवल, प्रशिक्षण इत्यादी) | सुरुवात 2 गाई पासून सुरवात केली.अभियानाच्या मदतीने 11 गाई . बँक 460000 लाख कर्जातून दूध काढण्याची मशीन खरेदी केली. |
| व्यवसायातून केलेली प्रगती (विक्री, सामाजिक स्थितीतील बदल) | अभियानाच्या माध्यमातून मिळालेल्या अर्थ साहाय्याने उद्योगास लागणारे गाई खरेदी केले व मिल्क मशीन खरेदी केली त्यातून 300 लिटर दुध रोज निघू लागले त्यामधून मोठा व्यवसाय निर्माण करण्यात आला. |
| उमेद अभियानाबाबत मत | उमेद अभियान मार्फत व्यवसाय सुरु करण्यासाठी मनीषा ज्ञानदेव करंजे यांना वयक्तिक कर्ज मिळाले यामुळे त्यांना आर्थिक हाथभार लागला व त्यांची आर्थिक उन्नती बरोबरच ग्रामीण उद्योजिका म्हणून त्यांची |






| | |
|---|---|
| महिलेचे नाव व पत्ता | सुमन ज्ञानेश्वर जाधव,गाव - खामगाव ,तालुका –शेवगाव ,जिल्हा –अहिल्यानगर |
| SHG चे नाव | श्री गणेश महिला स्वयं सहायता समुह |
| उमेद कडून आर्थिक मदत | RF – 30000,CIF – 60000, बँक कर्ज – 300000 |
| व्यवसायाबाबत माहिती (सुरुवात, भांडवल, प्रशिक्षण इत्त्यादी) | सुरुवातीच्या छोट्या उद्योगातून अभियानाच्या माध्यमातून मिळालेल्या अर्थ साहाय्याने उद्योगास लागणारे कच्चा माल ,माती ,चुना ,शाडू ,कलर, खरेदी केले त्यातून लहान,मोठे गणपती तयार केले व त्यामधून मोठा व्यवसाय निर्माण करण्यात आला. आणि आता उत्कृष्ठ प्रकार चे मोठी व लहान मूर्ती करण्यात आले |
| व्यवसायातून केलेली प्रगती (विक्री, सामाजिक स्थितीतील बदल) | उत्कृष्ठ प्रकार चे मोठी व लहान मूर्ती करण्यात आले तयार करून वेगवेगळया सणाला तसेच हंगामी विक्री ,आठवडी बाजार मध्ये स्टॉल लावून मोठी कमाई करता येऊ लागली ..वार्षिक उलाढाल 4 लाख पर्यंत होत असून उत्पन्न 3 लाख होत आहे .या मुळे कुटुंबाची चांगली प्रगती होत |
| उमेद अभियानाबाबत मत | उमेद अभियान  मुळे माझ्या  व्यवसाय चांगली मार्केटिंग ची सोय झाली त्या मुले माझे वार्षिक उत्पादन मध्ये चांगली वाढ झाली .धन्यवाद |






# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत विहीर कामाची यशोगाथा पंचायत समिती शेवगाव

लाभार्थी: श्री. सिताराम पांडू गायकवाड

ग्रामपंचायत: चापडगाव

तालुका; शेवगाव

जिल्हा: अहिल्यानगर

## पार्श्वभूमी

श्री. सिताराम पांडू गायकवाड हे चापडगाव गावातील एक लहान शेतकरी आहेत. त्यांची ३ एकर कोरडवाहू जमीन असून, शेती पूर्णपणे पावसावर अवलंबून होती. दरवर्षी कमी पावसामुळे पिकांचे नुकसान होत असे आणि त्यांना मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत होते.

## पूर्वीची स्थिती

श्री. गायकवाड यांच्या शेतावर पाण्याचा कोणताही शाश्वत स्रोत नव्हता. त्यामुळे पावसाळ्यातील पाणी पुरेसे नसल्यास पिकांचे उत्पादन कमी व्हायचे. उत्पन्नात घट होऊन कर्जाचा डोंगर वाढत गेला. काही वेळा मजुरीसाठी गावाबाहेर जावे लागत असे. घरखर्च, शेतीची गुंतवणूक आणि मुलांचे शिक्षण यावर त्यांचा संघर्ष सुरुच होता.

## योजनेचा लाभ

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत विहीर खोदकामासाठी अर्ज केल्यानंतर ग्रामपंचायतीमार्फत काम मंजूर झाले. शासनाच्या मदतीने विहीर खोदण्यात आली. यामुळे:

- विहीरीचा कायमस्वरूपी पाणीस्रोत तयार झाला.
- पिकांची विविधता वाढवता आली, जसे की भात, हरभरा, भाजीपाला.
- उत्पादनात लक्षणीय वाढ झाली.
- उत्पन्न वाढल्यामुळे आर्थिक स्थिती सुधारली.
- गावातील इतर शेतकऱ्यांसाठी ते प्रेरणास्थान झाले.

Scanned with OKEN Scanner

## सध्याची परिस्थिती

आज श्री. गायकवाड यांच्या शेतीला वर्षभर पाणी मिळत असल्याने ते विविध प्रकारची पिके घेऊ शकतात. त्यांनी मुलांचे शिक्षण सुरळीत चालू ठेवले आहे, कर्जाची परतफेड केली आहे, आणि शेतीत आधुनिक पद्धतींचा वापर सुरु केला आहे. आता ते स्वाभिमानाने जगत आहेत आणि त्यांच्या कुटुंबाचा आर्थिक स्तर सुधारला आहे.

## विहिरीचा फोटो



Scanned with OKEN Scanner